महाराष्ट्र शासन

क्रमांक – पीसीआय १०८९/ १२८७६ /
[३७५८] / तांशि-१
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २७ मे, १९९३.

प्रति,

अध्यक्ष,
पुणे जिल्हा शिक्षण मंडळ,
एरंडवणा, पौड रस्ता,
पुणे – ४११ ०३८.

विषय– औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी...

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात आपण शासनाकडे केलेल्या अर्जास व तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावास अनुसरुन राज्य-शासनाने आवश्यक तो शिफारस प्रस्ताव २९ जुलै, १९८९ रोजी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या पूर्वमान्यतेसाठी पाठविला होता. त्यावर आता अखिल-भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या क्रमांक – एफ – २७ –१० / ९३–ए.आय.सी.टी ई./४६९ , दिनांक १२ एप्रिल, १९९३ अन्वये पूर्वमान्यता दर्शविली असल्यामुळे शासन याद्वारे आपल्या संस्थेस " सासवड जिल्हा पुणे " येथे १९९३– ९४ या शैक्षणिक वर्षी ६० विद्यार्थी क्षमतेसह " वाघिरे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय " विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास पुढील अटी व शर्तींवर परवानगी देत आहे:—

१] अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र महाविद्यालये विनाअनुदान तत्त्वावर सुरु करण्यास परवानगी देण्यासंदर्भात शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक– टीईएम ३३८२/१११८३६/[१९० ] तांशि–१अ , दिनांक २१ मे, १९८३ अन्वये तसेच शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक– पीईसी–११९२/ [५२६०] / तांशि–१ , दिनांक २८ ऑक्टोबर, १९९२ अन्वये विहित करण्यात आलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील [ दोन्ही शासन निर्णयांची प्रत सोबत जोडली आहे ].

२] अखिलभारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या क्रमांक– एफ २७–१०/ ९३ –ए.आय.सी.टी.ई /४६९ , दिनांक १२ एप्रिल, १९९३ च्या मंजूरीपत्रात विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील.

३] संस्थेच्या संलग्नीकरणासाठी पुणे विद्यापीठाची मान्यता घ्यावी लागेल.

४] शासनाने विहित केलेल्या प्रवेश नियमांनुसारच विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक असेल.

५] शासनाने विहित केलेल्या व अखिलभारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी मान्य असल्याबाबत तंत्र शिक्षण संचालकांकडे करारनामा सादर करावा लागेल.

२. आपणास विनंती करण्यांत येते की आवश्यक त्या औपचारिक बाबी पूर्ण करण्यासाठी आपण संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याशी त्वरित संपर्क साधावा. आपणास असेही सूचित करण्यांत येते की सर्व बाबींची पूर्तता केल्याशिवाय व पुणे विद्यापीठाने लेखी स्वरुपात अंतिम परवानगी दिल्याशिवाय आणि सर्वोच्च न्यायालयाने विनाअनुदान तंत्रशास्त्र महाविद्यालयांच्या संदर्भात विहित केलेल्या योजनेच्या अंमलबजावणीबाबत राज्य शासनाकडून आवश्यक ते निदेश दिले गेल्याशिवाय आपण सदर अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये.

आपला विश्वासू,

सु जे सांगेकर

[ सु. जे. सांगेकर ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी --

१. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कक्ष अधिकारी, कार्यासन क्रमांक-विशि-२, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग.

प्रत माहितीसाठी -

१. अतिरिक्त सचिव [ तांत्रिक ], अखिलभारतीय तंत्रशिक्षण परिषद, डी-४७, न्यू दिल्ली साउथ एक्स्टेंशन, पार्ट-१, नवी दिल्ली - ११००४९.

२. सहाय्यक शिक्षण सल्लागार [ तांत्रिक ], भारत शासन, मनुष्यबळ विकास मंत्रालय [ शिक्षण विभाग ], पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल ॲश्युरन्स बिल्डींग, २ रा मजला, नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.

३. सचिव, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, १५, शामनाथ मार्ग, नवी दिल्ली -११००५४.

---